# प्रधान सचिव मालिनी शंकर यांच्याकडून नांदेड शहरातील स्वच्छता चळवळीची पाहणी

**प्रतिनिधी**

**नांदेड :** पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या प्रधान सचिव मालिनी शंकर यांनी आज नांदेड शहरातील काही निवडक भागात सुरू असलेल्या लोकसहभागातून स्वच्छता चळवळीची पाहणी करुन नांदेडकरांचे कौतुक केले. उदयनगर, लुंबीनीनगर या दोन परिसरात नागरिकांनी तयार केलेल्या ओल्या कचऱ्यापासून खड्ड्यांमध्ये खत निमि ेतीच्या लघु प्रकल्पाची त्यांनी पाहणी केली. तर लोकवर्गणीतून सार्वजनिक शौचालयाचा जिर्णोद्धार केलेल्या पक्कीचाळ येथील वस्तीलाही सौ. शंकर यांनी भेट देवून नागरिकांच्या उपक्रमाचे कौतुक केले.

मालिनी शंकर हे तीन दिवसाच्या नांदेड दौऱ्यावर आहेत. आज सकाळी त्यांनी नांदेड वाघाळा शहर म हानगरपालिकेच्यावतीने शहरातील काही भागात लोकसहभागातून समुदाय स्वच्छतेची पाहणी केली. या प्रसंगी मनपाचे अतिरिक्त आयुक्त राम गगराणी, उपआयुक्त रत्नाकर वाघमारे, सहायक आयुक्त (स्वच्छता) सौ. वस-ुधा फड, कार्यकारी अभियंता भागानगरे, क्षेत्रीय अधिकारी अविनाश आटकोरे, एस.टी.मोरे, आय.एल.एफ.एस.चे संजीव पाटील यांच्यासह नॉलेज लिंक व फिड बॅक या दोन स्वयंसेवी संस्थेची प्रतिनिधी उपस्थित होते.

सौ. शंकर यांनी गोदावरी नदी काठावरील नगिनाघाटला भेट दिल्यानंतर या कामाचे कौतुक केले. नांदेड शहरात यशस्वीपणे स्वच्छता चळवळ राबविणाऱ्या व्यक्ती व महिलांची माहिती पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडे पाठवावी, ती आम्ही विभागाच्या गृह पत्रिकेत प्रसिद्ध करु, असेही सौ. शंकर यांनी सांगितले.

शासकीय विश्रामगृहात पाणीपुरवठा विभागाच्यावतीने शहरात मनपाच्या वतीने लवकरच राबविण्यात येणाऱ्या २४ बाय ७ योजनेअंतर्गत नळाला मीटर लावण्याच्या प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. या प्रकल्पाचे सल्लागार नटराजन यांनी सादरीकरण केले. या प्रसंगी मनपा आयुक्त तसेच जिल्हाधिकारी डॉ. श्रीकर परदेशी व मनपाचे इतर अधिकारी उपस्थित होते.

२०११ मधील जनगणनेच्या प्राथमिक आकडेवारीनुसार नांदेडमधील ५ लाख ४१ हजार लोकसंख्येपैकी साध-ारणत: १ लाख ८५ हजार नागरिक गरीब वस्तीतील आहेत. नागरिकांच्या राहणीमानानुसार नळाच्या पाण्याची आकारणी करण्यात येणार असून प्रायोगिक तत्वावर ७६ हजार ९२९ लोकसंख्येच्या परिसरात सध्या ही योजना राबविण्यात येणार आहे. नांदेड शहराला करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्यापैकी ४७ टक्के पाण्यावरील महसूल म हापालिकेला मिळत नाही. यात सुधारणा घडवून नागरिकांमध्ये पाण्याविषयी जनजागृती करण्यासाठी हा प्रकल्प हाती घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

**लोकांमध्ये प्रबोधन करा - मालिनी शंकर**

नांदेड शहरात २४ तास मीटरने पाणीपुरवठा करण्याचा प्रकल्प उपयुक्त आणि अपरिहार्य असून नागरिकांमध्ये पाण्याविषयी जनजागृती झाल्याशिवाय असे प्रकल्प राबवणे कठीण जात असते. या योजनेचा फायदा आणि पाण्याची उपयुक्तता याविषयी जनतेमध्ये प्रबोधन व जनजागरण करावे, अशी सूचना प्रधान सचिव मालिनी शंकर यांनी मनपा प्रशासनाला केली.